माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/९८/२०१८
दि.०३/०८/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.विनीत डी. शाह, ................अपिलार्थी
५०३, वंदना गॅलेक्सी, विजय होम कॉम्प्लेक्स,
अमृतवाणी सत्संग मार्ग,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.विनीत डी. शाह यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२७/०६/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

a) Pls indicate daily progress made on letter dated 17/04/2018.
b) Pls give the name & designation of the officials & all depts. to which the letter reached, how long it was with him, what progress recorded during that period?
c) Specify the procedure followed after the letter reaches to your offices & reply to be provided as per citizen charter of MBMC replied copy if any else reason recorded for same.
d) Provide all point wise information asked in the letter.
e) Reasons recorded & Action taken report for not providing information after passing of 44 days, along with officer responsible, designation.
f) Copies of the action taken report, including Remarks, File Notings etc. against everyone responbile officer for taking improper/ incomplete/ no action on the said letter.
g) Kindly provide the copy of the plan of action for redressing the said letter? Give complete details.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत जाणीवपूर्वक माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२७/०६/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०३/०८/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३२७/२०१८ दि.३०/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- मला दि.२७/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास जी माहिती उपलब्ध आहे ती आज रोजी हस्ते देण्यात यावी. तसेच नगररचना विभागातील अधिकारी/कर्मचारी नगररचना विभागात किती वर्षांपासून कार्यरत आहेत. याबाबतची माहिती १० दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.विनीत डी. शाह,
५०३, वंदना गॅलेक्सी, विजय होम कॉम्प्लेक्स,
अमृतवाणी सत्संग मार्ग,
भाईंदर (प.), जि.ठाणे ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.